# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १६.०३.२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२९) इतिवृत्त**

गुरूवार दिनांक १६ मार्च २००६ रोजे स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशिनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह'' येथे दुपारी ३.५० वाजता 'वंदे मातरम्'या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगरसचिव व संबंधीत अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजेब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०५) श्री.जेजूरकर संतोष सुधाकर
(०६) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०७) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०८) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०९) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(१०) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(११) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१२) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१३) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१४) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

**संवाद :**

मा.सभापती : आजच्या सभेत सभा बजेटवर चर्चा होणार आहे (**विषय क्र.२७५**), तसेच काही अंदाजपत्रकाचे तसेच निविदा मंजूरीचे प्रस्ताव आलेले आहे त्यावर निर्णय झाल्यानंतर अर्थसंकल्पावर चर्चा करण्यात येईल. सर्व विषय सचिव यांनी वाचून दाखवावे.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र.२७६ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउबां) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा प्राणी संग्रहालय येथे पाणघोड्याच्या पिंजऱ्यासाठी बांधकाम करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००४-०५ च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रू.११,०९,९९५/- चे तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्तांनी दि.१३.१२.०५ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच मा.स्थायी समितीने ठराव क्र.१५० दि.२२.१२.०५ नुसार मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना ज.क्र.मनपा/लेखा/नि/९३/०६ दि.४.२.२००६ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १३ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अमन असोसिएटस् | २२.७९% कमी दराने |
| २ | चिस्ती कन्स्ट्रकशन | २२.७७% कमी दराने |
| ३ | मोना कन्स्ट्रक्शन | २५.७८६% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा २५.७८६% कमी दराची निविदा मोना कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी मोना कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा २५.७८६% कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा प्राणी संग्रहालय येथे पाणघोड्याच्या पिंजऱ्यासाठी बांधकाम करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २५.७८६% कमी दराची मोना कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, औरंगाबाद शहरातील मुख्य रस्त्यास विविध ठिकाणी खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.१९,७५,४००/- चे असून या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ३ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | डि.अजितसिंग | १४.४०% जस्त दराने |
| २ | मे.आदिनाथ कन्स्ट्रकशन | १५.५% जस्त दराने |
| ३ | चारणीया कन्सट्रक्शन | १६.००% जस्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.डी.अजितसिंग यांची असून ती अं.प.दरापेक्षा १४.४०% जस्त दराने आहे. परंतु वाटाघाटी अंती मा.आयुक्तांनी सदर काम अंदाजपत्रकीय दराने करण्याबाबत शिफारस केली आहे. तरी श्री.डी.अजितसिंग यांची निविदा मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मुजेब खान : विविध ठिकाणी म्हणजे कोणकोणत्या ठिकाणी काम करण्यात येणार आहे याचा उल्लेख करावा.

अति.शहर अभियंता : विविध ठिकाणचे चौक जेआहे तेथे काम करणे आहे. नावानिशी टाकलेले नाही.

श्री.मुजेब खान : ज्या ठिकाणी काम होणार आहे त्या बाबतीत नाव दर्शविलेले नाही हे बरोबर नाही काम झाल्यानंतर ते बरोबर झाले नाही तर जबाबदार कोण असणार, अशा अंदाजपत्रकास मान्यता देऊ नये.

अति.शहर अभियंता : सदर कामे ही ज्या विविध ठिकाणी रस्त्यावर अतिक्रमण झालेले आहे ते हटवून तेथे लगेच काम करावयाचे आहे.

श्री.मुजेब खान : कोणत्या ठिकाणचे अतिक्रमण हटविण्यात आले त्याबाबतीत माहिती दयावी. विविध ठिकाणी कामे असे टाकून काम करणे योग्य नाही.

अति.शहर अभियंता : उदा. घाटी. शंहागजभाग तसेच गारखेडा रस्त्यावर ज्या टपऱ्या बसलेल्या आहे त्या हटवून लगेच काम करावे यासाठी हे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. अनेक ठिकाणी अतिक्रमण हटविल्यानंतर पून्हा ८ ते १० दिवसांनी त्या ठिकाणी अतिक्रमण होते हा प्रकार होवू नये म्हणून लगेच काम करण्यासाठी हा प्रस्ताव सादर केलेला आहे.

श्री.मुजेब खान : रोषण गेट ते चप्पा मज्जेद पर्यत रस्ता रूदींकरणासाठी जगा भूसंपादीत केलेली आहे. पून्हा त्या जगेवर अतिक्रमण झालेले आहे. अनेक वेळा मुद्दा उपस्थित केला कार्यवाही करण्यात येत नाही. अधिकारी सांगतात शहांगज येथील टपऱ्या काढणार आजपर्यत एकही टपरी अतिक्रमण म्हणून काढलेली नाही त्या आधीच तेथे काम करण्यासाठी खर्चाचा प्रस्ताव मंजूरीसाठी येतो हे बरोबर नाही. ज्या भागातील टपऱ्या काढणार आहे ज्या ठिकाणी काम करणार आहे त्या कामाचे अंदाजपत्रक स्थायी समितीच्या मान्यतेसाठी यावे अशी विनंती आहे.

मा. सभापती : जे खूलासा करण्यात आला तो स्पष्ट झालेला नाही. महानगरपालिकेच्या हद्दीतील मोठमोठया रस्त्यावर टपऱ्या तसेच अनधिकृत बांधकाम झालेले दिसून येते. सभागृहात जेंव्हा एखादया भागाच्या संबधी अतिक्रमणाचा विषय समोर येतो तेंव्हा त्या जगेवरील अतिक्रमण हटविले जते. त्यानंतर त्या रस्त्यांचे काम करणे अत्यावशक असते. परंतू तेथे काम करण्यासाठी अंदाजपत्रक व नंतर निविदा होवून काम करण्यास अवधी लागतो त्या वेळात पून्हा तेथे अतिक्रमण होते. सार्वजनिक बांधकाम विभाग अशा पध्दतीने कार्यवाही करते की रस्त्यावरील अतिक्रमण काढल्यानंतर लगेच त्या रस्त्यावरील काम केले जते. त्याच धरर्तीवर हा प्रस्ताव आहे. जे खर्च लागणार आहे तो स्क्वेअर मीटरवर राहणार आहे. यापूर्वी दोन ठिकाणच्या कामांना मंजूरी दिलेली आहे.

श्री.मुजीब खान : अधिकारी ज्या भागाचे नाव घेतलेले आहे तेथील कोणतेही अतिक्रमण काढलेले नाही. अतिक्रमण न हटविता तेथेल कामाचे अंदाजपत्रक अगोदर पास करणे आवशक नाही. यापूर्वीच जेकाम केलेले आहे तेच दाखवून हे अंदाजपत्रक सादर केलेले आहे असे वाटते. १० महिण्यापासून अतिक्रमण काढण्याची सूचना करीत आहे कार्यवाही होत नाही.

मा.सभापती : तातडीने काम करण्यासाठी ही कार्यवाही होत आहे. म्हणूनच स्क्वेअर मीटरप्रमाणे हे काम केले जणार आहे. १९ लक्षचा खर्च हा अंदाजित दिलेला आहे. जसजसे अतिक्रमण हटविले जईल त्याप्रमाणे काम केले जईल.

श्री. मुजीब खान : जी तातडीने काम करावयाचे आहे त्या कामास मा. आयुक्त मंजूरी देवू शकतात. स्थायी समितीसमोर असे प्रस्ताव येण्याची आवशकता नाही. १० लक्षपर्यत काम करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहे. ते अशी तातडीची कामास मंजूरी देवू शकतात. या प्रस्तावास माझा विरोध आहे.

श्री.गजनन बारवाल : दोन ते तीन महिन्यानंतर पावसाळा येणार आहे. आज यास मंजूरी दिली नाही तर भविष्यात त्रास होणार आहे.एकाच ठिकाणी १९ लक्षचे काम होणार नाही म्हणून नावाचा उल्लेखच करू शकत नाही या प्रस्तावास मंजूरी देण्यास हरकत नसावी.

श्री.मुजीब खान : ज्या ठिकाणी काम होणार आहे त्याचा उल्लेख असावा. प्रस्तावास विरोध नाही. परंतू नावासहीत असावे. यापूर्वी जे काम केलेले आहे ते दाखवून बिले उचलली तर यास कोण जबाबदार राहणार आहे.जेवढे स्क्वेअर मीटर ज्या भागातील रस्त्याचे काम होणार आहे तेवढेच अंदाजपत्रक तयार करून सादर करावे त्यास मंजूरी देता येईल.

मा.सभापती : महानगरपालिकेची प्रशासकीय विभागाची यंत्रणा मोठी नाही. अतिक्रमण काढल्यानंतर लगेच त्या ठिकाणी अतिक्रमण होते. काम करता येत नाही. अशी परीस्थिती आहे.

श्री.मुजीब खान : अतिक्रमण काढल्यानंतर ६७(३) नूसार तातडीने तेथे काम करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहे १०लक्ष पर्यत कामांना ते मंजूरी देवू शकतात. मी सांगितलेल्या ठिकाणचे अतिक्रमण आतापर्यत काढलेले नाही. अतिक्रमण न काढता त्या आधीच सदर ठिकाणी कामाचे खर्चाचे अंदाजपत्रक मंजूरीसाठी येते हे योग्य नाही. हा जनतेचा पैसा आहे. काळजी घेणे आवशक आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे : यापूर्वी अशा प्रकारचा प्रस्ताव आलेला होता मी अक्षेप घेतला होता त्यावेळी सर्व अधिकारी यांना मा. आयुक्तांनी सूचना केल्या होत्याकी विविध ठिकाणी असे टाकू नये. ज्या ठिकाणी काम करणार आहे त्याचा उल्लेख असावा. यापूढे असे होवू नये अशी रूलींग दयावे.

सौ.लता दलाल :प्रस्ताव मंजूर करण्यास विरोध नाही परंतू पूढील बैठकीपर्यत कोणत्या भागात कामे केली जणार आहे याची माहिती संबधीत अधिकारी यांनी सर्व सदस्यांना दयावी.

श्री.रेणूकादास वैद्य :१९ लक्ष खर्चाची रक्कम कशाच्या अधारे निश्चित केलेली आहे.

मा.आयुक्त : हा प्रस्ताव मीच तयार करण्याचे अधिकाऱ्याना सांगितले होते. शहरातील ज्या ज्या ठिकाणी टपऱ्या व इतर अतिक्रमण रस्त्यावर झालेले आहे ते काढून तातडीने तेथे काम केले तर त्यावर कायमस्वरूपी संरक्षण होवू शकते हा प्रस्ताव माझाच होता परंतू प्रत्येक कामासाठी वेगवेगळे टेंडर त्यानंतर एक दोन महिने पून्हा ते तसेच राहते म्हणून रनिंग मीटर प्रमाणे करावे रस्त्याच्या बाजूला माती असते. पाणी साचते डबके तयार होतात. यात दोन प्रपोजल आहे फुटपॉथ तसेच रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे आहे. हे सर्व रक्कम कुठे खर्च झाली यांची माहिती दिली जईल.

श्री. मुजेब खान : गेल्या दहा महिण्यापासून या सभागृहात अतिक्रमणाच्या संदर्भात चर्चा होते परंतू एकाही ठिकाणी कार्यवाही केलेली नाही. अनेक इमारतीचे उदाहरण दिले आहे. आजपर्यंत कार्यवाही केलेली नाही. रोषण गेट. आझाद चौक जेथे लोकांच्या जगा घेवून त्यांना मोबदला दिला आहे तेथे अतिक्रमण झालेले आहे. तेही काढले नाही. विविध ठिकाणी म्हणजे कोठे असा प्रश्न निर्माण होतो. काही ठिकाणचे अंदाजपत्रक तयार आहे. काम चालू आहे. रोषण गेट ते कटकट गेट कडे जणारा रस्ता पूर्ण झालेला आहे. यास मंजूरी दिली व रोषणगेटच्या बाजूला डांबरीकरण केले असे पून्हा सांगण्यात आले तर आम्ही पाहायला जणार का? तातडीचे काम ६७(३)(क) खाली मा. आयुक्त करू शकतात. स्थायी समिती आपल्या बरोबर आहे. मा. आयुक्तांनी काम करावे. परंतू १९ लक्षचे अंदाजपत्रक तयार करून एका ठेकेदारास देणे हे बरोबर नाही.

मा.आयुक्त : ६७(३)(क) नुसार काम केले तर स्पर्धात्मक दर मिळत नाही. त्यामूळे महापालिकेचे नूकसान होते. अंदाजपत्रक जेवढे आहे तेवढेच काम होते. कॉम्पीकेट दर मिळायला पाहिजे लवकर पण काम व्हायला पाहिजे म्हणून कार्यवाही केलेली आहे. एम. बी रेकॉर्ड १०० टक्के होईल. ते कूठे ,खर्च झाले याची माहिती दिली जईल.

श्री.मुजेब खान : स्पील ओव्हरची कामे दोन महिण्यात साठ ते सत्तर टक्के करणार होते. अदयापही कामे झालेली नाही. काही नगरसेवकांच्या वार्डातील कामे या बजेटमधे आलेली नाही. पूर्वी बजेट मधे कमी जस्त करता येत होते. परंतू आता नावानिशी बजेट आहे. प्रशासनाने काही वार्डासाठी तरतूदच ठेवलेली नाही. जे काम करणे जरूरी नाही ते थांबवून नगरसेवकांनी पत्र देवून जी जी कामे करण्याचे सूचविले त्यासाठी ते बजेट खर्च करावे अशी विनंती आहे.

मा.सभापती : ठिक आहे. याची दखल घेतली जईल. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील मुख्य रस्त्यास विविध ठिकाणी खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम श्री.डी.अजितसिंग यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, ईटखेडा गांव ते पैठणरोडला जेडणाऱ्या नदीवर आर.सी.सी.पुल बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.३४,४६,०००/- चे असून सदर काम मन्नानखान महेबुब खान यांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जस्त दराने मंजूर करण्यात आलेले असून आतापर्यंत ७०% एवढे काम पूर्ण झालेलेल आहे.

सदर पुलाचे काम करीत असतांना अंदाजपत्रकात समाविष्ट असलेल्या काही बाबींच्या परिमाणात परिस्थितीनुरूप २५% पेक्षा जस्त वाढ होत असल्याने खालील बाबींचे (खींशाी) चे एींर खींशाी करणे आवश्यक आहे. सदरील खालील प्रमाणे आहेत.

१. Dewatering of excavated trenches.

२. Cement concrete M१५ for piers, abutments, returns
३. H.Y.S.D.Reinforcement
४. UCRS Retaining wall.

उपरोक्त कामाचे एुँीर खींशाी करणे करीता रू.७,१७,९००/- एवढा वाढीव खर्च अपेक्षीत आहे. तरी एुँीर खींशाी चे काम श्री.मन्नानखान महेबुबखान यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याकरीता वाढीव खर्च रू.७,१७,९००/- सह कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकाच्या खर्चास मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ईटखेडा गांव ते पैठणरोडला जेडणाऱ्या नदीवर आर.सी.सी.पुल बांधणेच्या कामामध्ये अंदाजपत्रकातील समाविष्ट काही बाबींच्या परिमाणात परिस्थितीनुरूप वाढ होत असल्याने प्रस्तावात दर्शविलेल्या बाबींचे (खींशाी) चे एुँीर खींशाी चे काम श्री.मन्नानखान महेबुबखान यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास वाढीव खर्च रू.७,१७,९००/- सह कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकाच्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७८/१ :**

'महिलांना व युवकांना' रोजगार मिळावा या उद्देशाने राज्य शासनाच्या शिफारशीनुसार शहरातील विविध भागामध्ये 'झुणका भाकर केंद्रासाठी' १० १२ (१२० चौ.फुट) आकाराची जगा १९९५ मध्ये दिल्या. याची मालकी औरंगाबाद महानगरपालिकेची आहे.

राज्य शासनाने ही योजना बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे झुणका भाकर विक्रीसाठी वापरात नाहीत. सबब शहरातील बेरोजगार युवकांना व महिलांना रोजगारापासून वंचित व्हावे लागत आहे. महिला व युवकांना रोजगार मिळावा तसेच गोरगरीब जनतेस माफक दरामध्ये खाद्य-पेय व जीवनावश्यक वस्तु मिळाव्यात यासाठी संबंधीत व्यक्तींना त्या-त्या ठिकाणच्या जगा व्यवसायाकरीता दिल्या जव्यात. जेणे करून त्यांचे कुटुंबियांना उदरनिर्वाहाकरीता उत्पन्न मिळेल. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ. लता दलाल अनुमोदक: श्री. गजनन बारवाल

**संवाद :**

श्री. विनायक पांडे : राज्य शासनाचा निर्णय आहे. आपण ठराव ठेवतो विधी सल्लागार यांचा कायदेशीर सल्ला घेवून निर्णय घेण्यात यावा.

श्री. मुजेब खान : शहरात किती जगा किती व कोणत्या लोकांना झुणका भाकर केंद्रसाठी दिलेल्या आहेत.याचा खूलासा होणे अपेक्षीत आहे.

मा. सभापती : स. सदस्यांनी हा प्रस्ताव ठेवलेला आहे. प्रशासनाकडून आलेला नाही. विधी सल्लागार यांचा सल्ला घेतल्यानंतरच प्रशासनाने या संदर्भात निर्णय घेण्यात यावा. अशा सूचना करण्यात येत आहे. त्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

श्री. साहेबराव कावडे : चिकलठाणा येथील झुनका भाकर केंद्र पोलीस चौकीसाठी देण्यात आलेले आहे ते वगळून यास मंजूरी दयावी.

मा. सभापती :रूलींग दिलेले आहे. कायदेशीर सल्ला घेवूनच कार्यवाही प्रशासन करेल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झुणका भाकर योजनेअंतर्गत राज्य शासनाच्या शिफारशीनुसार शहरातील विविध भागामध्ये 'झुणका भाकर केंद्रासाठी' १० १२ (१२० चौ.फुट) आकाराच्या १९९५ मध्ये देण्यात आलेल्या जगा बेरोजगार महिला व युवकांना रोजगार मिळावा तसेच गोरगरीब जनतेस माफक दरामध्ये खाद्य-पेय व जीवनावश्यक वस्तु मिळाव्यात यासाठी संबंधीत व्यक्तींना त्या-त्या ठिकाणच्या

जगा व्यवसायाकरीता विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेऊन, भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री. मुजीब खान : मी मागिल बैठकीत माहिती विचारली होती की जकात मधे गरवारेचे केमिकल वर्षात किती येत होते. त्यावर २.७५ रू प्रमाणे जकात आकारणी होणे गरजेचे होते. परंतू महानगरपालिका १ रू प्रमाणे जकात आकारणी करीत होते. खाजगी अभिकर्ता २.७५ रूपये प्रमाणे वसूल करीत आहे. एक वर्षात किती केमिकल येत होते व किती नूकसान होत होते याचा खूलासा करावा. जर चूकीने अधिकाऱ्यानी १ रूपये प्रमाणे वसूल केले असेल तर त्याची भरपाई अधिकाऱ्याकडून केली पाहिजे व संबधीत जे अधिकारी असेल त्यांचेवर कार्यवाही केली पाहिजे

श्री.बारवाल गजनन : अनेक व्यापाऱ्यांना जकात अभिकर्ता यांचेकडून त्रास होत आहे. श्री. संजय पवार नावाचे कर्मचारी हे अनेक व्यापाऱ्याकडून १२०० रू ऐवजे २००० दंड वसूल करीत आहे. सेंट्रल नाक्यावर त्रास देतात, त्यांना काय अधिकार आहे. वसूल करण्याचा प्रत्येक नागरीकांना व्यापाऱ्याना नाक्यावर त्रास दिला जत आहे. मागिल बैठकीत मी या संदर्भात चर्चाही केली होती त्यात जी सूधारणा होणे अपेक्षीत होते ती झालेली नाही. अनेक नागरीकाचे फोन माझ्याकडे आलेले आहेत. जकात खाजगी अभिकर्ता यांचेकडे प्रशासन लक्ष देत आहे का पाहणी करीत आहे याचा खूलासा करावा.तसेच अनेक गाड्या सेन्ट्रल नाक्यावर पाठविल्या जतात. तेथे कोणती रेट लिस्ट नाही. सर्व नाक्यावर जकातीचे दर कोणत्या मालावर किती आहे याची यादी असावी उपआयुक्त (महसूल) यांना या सदर्भात मी बोललो होतो तरीही कार्यवाही केलेली नाही.

मा.सभापती : खाजगी अभिकर्ता यांची नेमनूक केल्यानंतर जकात वसूली करतांना अनियमितता होत आहे महापालिकेची बदनामी होईल. नागरीकांना त्रास होईल असे कृत्य ंसबधीत ठेकेदाराने करू नये याची प्रशासनाने दखल घ्यावी. तसेच प्रत्येक नाक्यावर जकातीचे दरपत्रक लावण्यात यावे. मागिल बैठकीत स. सदस्य श्री. बारवाल यांनी जी भावना व्यक्ती केली होती त्या संबधीत संबधीत ठेकेदार यांना समज दिलेली आहे. जकात संदर्भात गभीर स्वरूपाच्या तक्रारी असेल तर त्याची माहिती उपआयुक्त तसेच जकात अधिक्षक यांनी पदाधिकारी तसेच मा. आयुक्त यांना दयावी अशा सूचनाही दिलेल्या आहे. कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार या सभागृहाला तसेच सर्वसाधारण सभेला आहे याचीही नोंद घ्यावी.

श्री.गजनन बारवाल : जकात नाक्यावर सकाळी ६ वाजेपासून ते ९.३० पर्यत महापालिकेचे कूणीही कर्मचारी नगर नाक्यावर उपस्थित नव्हते. त्या संदर्भात प्रशासनाने काय दखल घेतलेली आहे. तेथे कर्मचारी का नव्हते याची माहिती प्रशासनाने घेतलेली आहे का?

मा. सभापती : आपली जी तक्रार होती त्या संदर्भात संबधीत ठेकेदार यांना सूचना दिलेल्या आहे. रविवारी कामकाज करता यावे म्हणून रविवारी देखील कर्मचारी बसविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. वेळेचा अपव्यय होऊ नये. केमिकल्सच्या बाबतीत जे मुद्या उपस्थित केला त्या संदर्भात जकात अधिक्षक यांनी खूलासा करावा.

श्री. गजनन बारवाल : नगर नाक्यावर महापालिकेचे कर्मचारी का नव्हते याचा खूलासा घ्यावा. साडेतीन तास तेथे कूणीही नव्हते. तेथे बोगस पावत्या दिल्या गेल्या प्रत्यक्ष तेथे जस्तीचे पैसे घेण्यात आले हे स्पष्ट करतो.

जकात अधिक्षक : गरवारे कंपनीची पॉलीस्टर, एमईजे, जीएमजी या तीन प्रकारचे मटेरियल शहरात येते.२.७५रूपये प्रमाणे जकात वसूल केली जते. सर्व कर्मचाऱ्याना तशा सक्त सूचना दिल्या आहेत. जकातीचे जे दर आहेत त्यापेक्षा कमी करू नये. केमीकल्सचा रू.२.७५% पेक्षा कमी दर आकारण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री.मुजेब खान : १ रू टक्का प्रमाणे केमिकलवर जकात वसूल केलेली आहे सभागृहाची दिशाभूल करू नये. या संदर्भात सबंधीत कंपनीचे मॅनेजर व महापालिकेचे अधिकारी यांची तीन तास चर्चा चालू होती. अधिकाऱ्यांची चौकशी चालू आहे त्यांनाच तेथे का ठेवले जते कळायला मार्ग नाही. मा.आयुक्त यांनी या संदर्भात पर्सनल चौकशी करावी. रूपये २.७५ प्रमाणे जकात वसूल करावयास पाहिजे होती परंतू महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याच्या चूकीमूळे कर्मचारी यांनी १रू. प्रमाणे केमिकलवर जकात घेतलेली आहे. यात महानगरपालिकेचे लाखो चे नूकसान झालेले आहे.संबधीत अधिकारी यांची चौकशी चालू आहे त्यांची जकात विभागातून बदली करावी नसता मला रस्त्यावर उतरावे लागेल ती वेळ येवू नये त्यासाठी त्याची ताबडतोब बदली करण्यात यावी.

श्री. कवरसिंग बैनाडे : गरवारे कंपनी असे कृत्य करणार नाही. ती सोशल वेलफेअरची कामे करणारी एकमेव कंपनी आहे इतिवृत्तात येवू नये. अधिकारी दोषी असेल तर कार्यवाही करावी. स.सदस्याकडे जे काही पूरावे असतील ते द्यावे त्यानंतर कार्यवाही करता येईल. ही कंपनी गरवारे क्रिडा संकुल, वाचनालये चालवते, ही कंपनी असे कृत्य करणार नाही.

श्री.मुजेब खान : एक रूपयाप्रमाणे जकात घेतल्यामूळे वर्षाला महानगरपालिकेचे ६.५० लक्षचे नूकसान झालेले आहे ही सत्य घटना आहे .याची चौकशी होणे आवशक आहे. कंपनीची चूक नाही अधिकाऱ्याची चूक आहे हे निदर्शनास आणून देत आहे.सहा महिण्यापासून जकात पावती बूक संदर्भात बोलत आहे कार्यवाही होत नाही. मी पूर्ण पुरावा आणून देतो.

श्री. कवरसिंग बैनाडे : या संदर्भात कमेटी नियुक्त करावी किंवा दोषी असेल तर काढून टाकावे.

मा.आयुक्त : स. सदस्यांनी जे पत्र मला दिले आहे त्यात असे म्हटले की यापूर्वी केमिकलवर जकात एक रूपये प्रमाणे आकारण्यात येत होती. आज संबधीत ठेकेदार २.७५ रू. टक्का प्रमाणे आकारणी करीत आहे. या बाबतीत काय चूक झालेली आहे चौकशी करण्याचे आदेशीत मी केलेले आहे. पूर्वी काही चूक झालेली आहे असे निदर्शनास आले तर कार्यवाही होवू शकते.

मा. सभापती :स. सदस्य श्री. मुजेब खान यांनी जे मत व्यक्त केले ते माहितीच्या अधारेच केलेले आहे. वेगवेगळया प्रकारचे केमिकल्स येतात व वेगवेगळे चार्जेस अनेक दिवसापासून आकारले जते. जे केमिकल येत होते ते त्यावर किती जकात घ्यावयास पाहिजे होती याची चौकशी होईल. कदाचित खाजगी अभिकर्ता हे २.७५ रू.प्रमाणे जी जकात आकारत आहे ती चूकीची आकारत आहे असेही होवू शकते. महानगरपालिकेच्या हद्दीत उद्योग धंदे चालण्याच्या दृष्टीने चांगले निर्णय या महापालिकेने घेतलेले आहे. या बाबतीत प्रशासनाने चौकशी करून जे वस्तूस्थिते होती त्या संदर्भात संपूर्ण माहिती सभागृहात ठेवावी.

श्री.मुजेब खान : अधिकाऱ्याची चौकशी चालू आहे त्यांना जकात विभागातून बदली करावी वारंवार विनंती करीत आहे बदली होत नाही. मा. आयुक्तांनी आश्वासन दिले होते.

मा.आयुक्त : जेंव्हा एप्रिलमध्ये जनरल बदल्या होतील त्यावेळी मुल्यमापन करून बदली केली जईल.

श्री.मुजेब खान : कार्यवाही केली नाही तर मी उद्या दुपारपासून उपोषणास बसेल. मा. आयुक्तांना पत्रही देतो.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी या बाबत चौकशी करावी. आता अर्थसंकल्पावर चर्चा करावी.

**<u>विषय क्र.२७५ :</u>**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९६ अन्वये सन २००५-२००६ चे सुधारित व सन २००६-२००७ चे मुळ अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

श्री. कवरसिंग बैनाडे : हे शहर ऐतिहासीक शहर आहे. सर्व महापूरूषाचे पुतळे या शहरात आहे. महाराणा प्रताप यांचा पूतळा व्हावा म्हणून १९९५ साली सर्वसाधारण सभेने ठराव घेतला होता अदयाप कार्यवाही केली नाही. पुन्हा मे महिण्याच्या सर्वसाधारण सभैत या संदर्भात प्रस्ताव मंजूर झाला तरी अदयाप कार्यवाही नाही. तसेच या बजेट मधे त्यासाठी तरतूद ठेवलेली नाही. ती ठेवावी व एमजीएम चा कॉर्नरवर जे चौक आहे तेथे हा पूतळा उभारण्यात यावा.

श्री. गजनन बारवाल : महाराणा प्रताप याचा पुतळासाठी आताच मंजूरी देवून एजन्सी फिक्स करावी अशी विनंती आहे.

सौ. लता दलाल :जे प्रस्ताव आताच मांडला आहे त्यास माझी सम्मती आहे. तसेच बेगमपूरा येथे संभाजे महाराज यांचा पूतळा व्हावा म्हणून गेल्या सर्वसाधारण सभेत मंजूरी मिळाली परंतू त्यासाठी या बजेट मधे तरतूद दिसून येत नाही. त्यासाठीही तरतूद करावी असा प्रस्ताव मांडते.

श्री.विनायक पांडे : यास माझे अनूमोदन आहे.

श्री. मिलींद दाभाडे : मागिल वर्षीच्या अर्थसंकल्पात भडकल गेट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा प्रतिकृति बरोबर नसल्यामूळे तो बदलण्यात यावा त्या बाबतीत आम्ही मागणी केलेली होती. त्यासाठीही तरतूद ठेवण्यात यावी.

मा.सभापती : मा. आयुक्त यांनी स्थायी समितीला सुधारीत व नवीन अर्थसंकल्प सादर केलेला आहे. त्यावर चर्चा करून योग्य तो निर्णय आपणास घ्यावयाचा आहे. या अर्थसंकल्पात अनेक बाबीचा उल्लेख आहे. मागिल वर्षाच्या काही कामाचा उल्लेख आहे. यावर चर्चा करतांना चांगल्या पध्दतीने सूचना कराव्यात अशी अपेक्षा ठेवतो.सन २००५-२००६ मधे जी जमेची बाजूआहे त्यावर चर्चा करावी.

श्री. बारवाल गजनन :या बजेटमधे मोठया प्रमाणात बि.ओ.टीची कामे या बजेटमधे आलेली आहे. तसेच खाजगीकरणाचा विषय यात आहे. प्रशासन कुठेणा कुठे तरी कमी पडते याची जणीव आपणांस आहेतच. जे वसूलीचे टारगेट दिले होते ते होत आहे करणार आहोत असे दिले. हे बरोबर वाटत नाही. मालमत्ता कराची वसूली मोठया प्रमाणात पेडींग असून अनेक प्रकरणे झालेली आहे. अनेक लोकांना नोटीसा दिल्या नवीन मालमत्ता शोधल्या परंतू जी वसूली झाली ती योग्य त्या प्रमाणानूसार नाही हे मान्य करावे लागेल. यात म्हटले आहे पाणीपट्टी खूपच कमी आहे थोडया फार प्रमाणात वाढवू शकतो. यात ११०० रूची वाढ सूचवली आहे. जी तूट आलेली आहे त्या बाबतीत प्रशासन कूठेतरी कमी पडलेले आहे. हे नाकारता येणार नाही. विकास कामे झालेली नाही. कामांना सूरूवात झालेली आहे हे निश्चित आहे. परंतू पाहिजेतेवढी विकास कामे झालेली नाही. सिडकोसाठी १५ कोटीची तरतूद केली आहे. ती कमी पडणार असून आणखी ठेवावी लागणार आहे. तेथेही विकास कामासाठी जस्तीचा खर्च करावाच लागणार आहे. या बजेटवर सविस्तर अशी चर्चा करावी अशी विनंती आहे.

श्री. रेणूकादास वैद्य : बजेटमधे पाणीपट्टी वाढ मोठया प्रमाणात केलेली आहे. प्रत्यक्ष वसूली किती आहे हे दाखवले परंतू त्या त्या वर्षाची मागणी किती आहे हे कुठेही दाखवले नाही. याचा अर्थ प्रशासन वसूली करण्यात कमी पडते हे मान्य आहे. १२ लक्ष शहराची लोकसंखया असतांना ८८ हजर नळ कनेक्शन दाखवले एका नळावर किती लोक पाणी भरतात हा सूध्दा प्रश्नआहे. पाणीपट्टीत ११००/-रू.ची वाढ केली ती करण्याची आवशकता नाही. यात नमूद केलेली नळ संख्येपेक्षा चार पट नळ कनेक्शन या शहरात आहे. याची दखल प्रशासन घेत नाही. अनधिकृत नळ कनेक्शन व त्यावर मिळणारा महसूल याकडे लक्ष दिले तर एक ही रूपयाची वाढ करण्याची गरज नाही. दरवर्षी पाणी प्रश्न

मांडतांना पंप दुरूस्ती व इतर कामासाठी ५ ते ६ कोटी रूपये तरतूद ठेवली जते. एवढ्या मोठया प्रमाणात दुरूस्ती होते का? पंप जुने झाले असतील तर ते काढून नवीन पंप बसविण्यात यावे. हा खर्च कमी करू शकतो असे माझे मत आहे. पाणीपट्टीत कोणतीही वाढ सूचवू नये अशी विनंती आहे.

श्री. विनायक पांडे : या शहराची लोकसंखया जवळपास १५ लक्ष असेल. व ८८ हजर नळ कनेक्शन नमूद केले ते संयुक्तीक वाटत नाही. जे मालमत्ता कर भरतो त्यांचेकडे नळ कनेक्शन असावयासच पाहिजेत. अनधिकृत नळ कनेक्शन शोधले तर पाणी पट्टीत कुठलीही वाढ करण्याची गरजनाही असे माझे मत आहे.

मा. सभापती : सन २००५-६ च्या सुधारीत अर्थसंकल्पातवर चर्चा करावी. हेडवाईजचर्चा केली तर योग्य होईल.

सौ. लता दलाल : जकातीचे उद्दिदष्ट ८३ कोटीचे होते वसूली किती झालेली आहे याचा खूलासा करावा.

मा.आयुक्त : मार्च अखेर ८३ कोटीचे जकातीचे वसलीचे उद्दिदष्ट पूर्ण होईल.

सौ.लता दलाल : पाणीपट्टीचे जेउद्दिदष्ट होते ते पूर्ण झालेले नाही त्याची कारणे अनेक आहे. शहरात मालमत्ता किती आहे व एका मालमत्तेसाठी एक नळ कनेक्शन आहे का हे शोधले पाहिजे अनेक अनधिकृत वस्त्या आहेत. त्याची नोंद आजही मनपाकडे नाही. सर्वे करणेसाठी स्पेक या संस्थेला दीड दोन कोटीचा खर्च देण्यासाठी ठेवलेला होता.जेवढया मालमत्ता आहे तेवढे नळ कनेक्शन असतील व त्याप्रमाणे वसूली झालेली असेल तर खऱ्या अर्थाने वसूली झाली असे म्हणता येईल.वसूली तर काही भागातून होत नाही परंतू त्या पाण्यावर खर्च महापालिकेला करावा लागतो ती वसूली कूणाकडून करणार आहोत ते नळ कनेक्शन कूठे आहे हे शोधले पाहिजे जी पाणीपट्टीची वाढ दर्शविलेली आहे. ती योग्य नसून जे नियमित भरतात त्याचेवर अन्याय होईल असे वाटते. अनधिकृत नळ कनेक्शन शोधावे त्याचेकडून पाणीपट्टी वसूल करावी. पाणीपट्टीत कूठलीही वाढ करू नये यास आमचा विरोध आहे. या शहरात किती मालमत्ता आहे याचे सर्वेक्षण करण्यासाठी स्पेक या संस्थेला काम दिले होते परंतू आजही किती मालमत्ता आहे याची नोंद महापालिकेकडे नाही. जे कर वसूल व्हायचाआहे तो होत नाही. स्पेक ही संस्था दोन वर्षापासून काम करते. विकास कामे करतांना त्या कामाचे अंदाजपत्रक बनवतांना स्पेकचा उपयोग झालेला नाही. अशी परीस्थिती आहे. जे सर्वेसाठी खर्च झाला तो सूध्दा वाया गेलेला आहे असे वाटते. तसे सर्वेचे काम वेळेवर न केल्यामूळे जे कर आकारणी करावयाची होती ती करता आली नाही अर्थातच महानगरपालिकेला जेउत्पन्न येणार होते ते आले नाही हा दुसरा तोटा आहे. या शहरात कमर्शियल नळ कनेक्शन मोठया प्रमाणात आहे. हे जेपाणी जते याचा हिशोब कूठे नाही. अनधिकृत घेतलेले नळ कनेक्शन अधिकारी कर्मचारी यांना माहित आहेत ते शोधावे त्यातून महापालिकेचे उत्पन्न वाढवावे पाणीपट्टीत कोणतीही वाढ करू नये.

श्री. कवरसिंग बैनाडे :पैठण हून पाणी कसे येते तेथे बैठक घेतल्यामूळे प्रत्यक्ष माहिती मिळाली.यासाठी कॉलेजच्या विदयार्थ्यांना दाखवले पाहिजे त्यांनाही कळेल की शहरात पाणी आणण्यासाठी महापालिकेला किती त्रास होतो व जेआरोप अधिकाऱ्यावर होतात ते कमी होतील. पाणी हे जेवन आहे. पाणी पट्टी वाढ करण्यास विरोध नाही परंतू इतर काही विकास कामे थांबवून पाणीपूरवठयासाठी जस्तीची तरतूद ठेवावी व शहरातील नागरीका मुबलक पाणी दयावे नागरीक पाणीपट्टी भरण्यास तयार राहतील. सिडको हडको भागात १ दिवसाआड पाणी मिळते त्या प्रमाणे पाणीपट्टी वसूल करावा. प्रत्येक भागात पाण्याची टंचाई आहे. शहरात ज्या प्रमाणे पाणी दिले जते त्याप्रमाणेच दररोज सिडको हडको भागातही पाणी द्यावे. पाणीपट्टी वाढीला विरोध आहे.

श्री. मुजीब खान : पाणीपट्टीची थकबाकी किती आहे ती वसूल केली पाहिजे वसूली होत नसेल तर पून्हा त्या नागरीकांना डबल भरावे लागेल. जयकवाडीपासून शहरापर्यत किती कपन्याना किती इंची कनेक्शन दिलेले आहे व त्याची पाणीपट्टी महापालिकेने वसूल केलेली आहे याचा खूलासा करावा. मोठमोठे हॉटेल मधे दोन दोन कनेक्शन आहेत. त्याची तपासणी केली पाहिजे तसेच रोषणगेट येथे एक बर्फचा कारखाना असून त्यांचेकडे पाच ते सहा लक्ष थकबाकी आहे. त्याचेकडून वसूली का केलेली नाही. आजपर्यत का वसूली केली नाही. संबधीत मालक मालमत्ता विकून जण्याच्या मार्गावर आहे. तर वसूली कूणाकडून करणार. जे विकत घेईल तो महापालिकेला पाणीपट्टी कोठून देणार त्या संदर्भात एक अपंग व्यक्तीने पत्रही दिलेले आहे त्या इमारतीमधे तो दुकान घेवून रहातो. माझा दुकानचा जे कर येतो तो माझ्या नावाने दयावा व उर्वरीत कर मालकाकडून वसूल करावा. परंतू प्रशासन या बाबतीत गप्प का? मोतीवाला हॉल येथे नळ कनेक्शन दिले होते ते आजही चालू आहे. त्याचेकडून अद्याप वसूली केलेली नाही याचे कारण काय? गरीब लोकाकडे थकबाकी असल्यास नळ कनेक्शन कट केले जते परंतू मोठे जे लोक आहे त्याचेवर कार्यवाही होत नाही. बाबा पेट्रोल पंप ते मुंकूदवाडी पर्यत जेकमर्शियल नळ कनेक्शन आहे त्याचे कडे मोठमोठे नळ कनेक्शन अनधिकृत घेतलेले दिसून येईल. कमर्शियल लोकाकडून जे जलना रोडवर आहे त्याांचेकडून किती वसूली केलेली आहे याचाही खूलासा व्हावा. जे पाणी चोरी करून लोक घेत आहे त्याची चौकशी करून वसूली केली नाही च इतर लोकांना पाणी मिळाले नाही. प्रशासन वसूली करीत नाही विकास कामाच्या बाबतीत बोललो तर बजेट नाही म्हणून सांगण्यात येते.कमर्शियल जेनळ कनेक्शन आहे त्याचेकडून थकबाकी वसूल करावी. जेणे करून पाणीपट्टी वाढ करण्याची गरजपडणार नाही व जेलोक इमानदारीने पैसे भरतात त्यांचेवर बोज पडेल असे होवू नये.

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी खूलासा करावा.

वार्ड अधिकारी -क : रोषणगेट येथे बर्फचा चार वर्षापूर्वी कारखाना होता. त्याचे मालक छोटूभाई पोपटभाई हे असून चार वर्षापासून मालक येथे नाहीत. ती मालमत्ता संबधीत व्यक्ती विकणार असे जेव्हा कळाले तेव्हा संबधीत कर मूल्य निर्धारक व संकल्क अधिकारी श्री. फड साहेब यांना कळविले त्यानंतर रजिष्ट्री कार्यालयास तसे कळवून या मिळकतीची रजिष्टी कूणी करीत असेल तर महानगरपालिकेची थकबाकी वसूल करायची आहे. तसे कळविले आहे. रजिष्ट्री होवू नये असे कळविले आहे. तेथे दोन नळ कनेक्शन असून सध्या कारखाना अस्तित्वात नाही. ५.३३ लक्ष पाणीपट्टी थकबाकी आहे. मालमत्ता कर ४.१६ लक्ष बाकी आहे.

मा.आयुक्त : ऑक्शन का केलेले नाही.

वार्ड अधिकारी. क : सदर जगेवर मालक मिळत नाही. तेथे नोटीस डकवलेली आहे.

मा.आयुक्त : ऑक्शनची कार्यवाही सुरू करावी. थकबाकी वसूल करावी अशा सूचना अधिकारी यांना देण्यात येते. ७/१५ दिवसाची नोटीस लावावी. त्यानंतर ऑक्शन करावे कूणी जरी नाही विकत घेतली तर महानगरपालिका १ रूपयामध्ये विकत घेईल.

श्री. मुजीब खान : संबधीत मालक यांचे पार्टनर यांचे घर एस. टी. कॉलनी मधे आहे. अधिकारी सांगतात कुणी भेटत नाही. अशा अनेक मालमत्ता आहे. त्यांचेकडे मोठी थकबाकी आहे.माझे वार्डात गरीब लोकांकडून थकबाकी वसूल केली जते मोठे लोकांना टाईम दिला जतो. गरीबाकडे पैसा नसतो त्यांना वेळ दिला पाहिजे परंतू तसे होत नाही अधिकारी तातडीने कार्यवाही करतात.

सौ. संगिता जधव : पाणीपट्टी वाढ रद्द करण्यात यावी नागरीकांना एक दिवसा आड पाणी येते. तसे झाल्यास लोक रस्त्यावर उतरतील.

सौ. वंदना खंदारे : पाणी पट्टी वाढ करण्यात येवू नये.

श्री.मुजीब खान : शहरातील नागरीकांना असे वाटते की पिण्याचे पाणी हे सरळ सोप्या पध्दतीने येते परंतू यासाठी महानगरपालिकेला किती परीश्रम घ्यावे लागते किती खर्च होतो. यंत्रणा कशी राबवावी लागते. ही सर्व माहिती होणयासाठी शाळा महाविदयालय यांना ज्या वेळेस सूट्टया असतात त्यावेळी विदयार्थ्यासाठी व इतर नागरीकासाठी एक महिना व्हिजेट देण्यासाठी ठेवावा. एक बूकलेट तयार करण्यात यावे. जेणे करून नागरीकांना माहिती होईल व नागरीक पाणी वाया जवू देणार नाही. बचत करेल.

श्री.विनायक पांडे : स. सदस्य श्री. मुजेब खान यांनी जे सूचना मांडली त्यास माझी सम्मती असून यात जे जेष्ठ नागरीक आहे ते इच्छा प्रगट करीत असतील तर त्यांनाही याचा ही संपूर्ण प्रक्रिया दाखवावी.

मा.सभापती : शहराला पाणी कसे येते याची माहिती नाागरीकांना तसेच शालेय विदयार्थ्यांना होण्सासाठी एक सहल काढण्यात यावी असा मनोदय स. सदस्यांनी केला. सुचना चांगली आहे. प्रत्यक्षात करणे अवघड आहे. यासाठी प्रसार माध्यमाशी सलग्न राहून शहरात कशा पध्दतीने पाणी आणले जते हे जनतेपर्यत पोहचविण्याचे काम केले जईल. तसे वृत्त वाहिन्याने काम करावे. इतर शहर व या शहरातील पाणी पूरवठा योजना कशा पध्दतीने राबविली जते.याची जनतेपर्यत माहिती पोहचेल. याबाबत पत्रकारांना विनंती आहे की, त्यांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून ही माहिती जनतेपर्यंत पोचवावी.

श्री.साहेबराव कावडे : शहरात जवळपास ४० टक्के पाणी वाया जते व चोऱ्या थांबविल्यास किमान १० वर्ष पाणीपट्टीत वाढ करण्याची गरज नाही.जेथे घर असेल तेथे नळ कनेक्शन असणे आवशक आहे. मोठया प्रमाणात अनधिकृत नळ कनेक्शन आहे त्या संबधी कार्यवाही होत नाही दरवर्षी या संदर्भात चर्चा होते. कार्यवाही नाही. पाणी चोरीत प्रशासनाच्या ज्या चूका होत्या त्यात सूधारणा होण्याची गरजआहे. जलना रोड बायजीपूरा रस्त्यावर मोठया पाईपवर अनधिकृत कनेक्शन घेतलेले आहे त्यांना २४ तास पाणी मिळते. जे नियमीत पाणीपट्टी भरतात त्यांचेवर बोज वाढेल .जे चोरी करतात ती होवू नये यासाठी प्रशासनानेकार्यवाही करावी. अनेक भागात दररोज पाणी मिळते परंतू सिडको भागात एक दिवसा आड पाणी दिल्या जते पाणीपट्टी ही पूर्ण वर्षाची घेतली जते त्या नागरीकांवर अन्याय होतो असे माझे मत आहे. शहरात कमर्शियल नळ किती आहेत याचा शोध घेणे आवश्यक आहे. त्यामुळे महापालिकेला उत्पन्न मिळू शकते.

सौ. लता दलाल : आतापर्यत पाणीपट्टीची वार्ड कार्यालय निहाय वसूली किती झालेली आहे. किती अनधिकृत नळ कनेक्शन आहे. कमर्शियल मधे सूध्दा अनधिकृत रित्या वापर होतो. जी वाढ सूचविलेली आहे ती अभ्यास पूर्वक दिसत नाही. सखोल अभ्यास झालेला नाही. समांतर जल वाहिनी टाकणार आहोत. बीओटी तत्वावर दयायचे झाले तरी हा खर्च वसूल करावाच लागणार आहे. पाणीपूरवठया संदर्भात सखोल अभ्यास केला पाहणी केली तर त्यावरील बराचसा खर्च कमी होवू शकतो असे माझे मत आहे. जीवाढ सूचविलेली आहे ती कितपत योग्य आहे.

श्री.गजनन बारवाल : अर्धा इंच ते दोन इंची नळ कनेक्शन पर्यत वाढ करूनये पूढील वाढ करावी.

श्री. साहेबराव कावडे : प्रशासनाने पाणीपूरवठयात सूधारणा केली तर दहा वर्ष पाणी पट्टी वाढविण्याची गरज नाही.

श्री.मुजीब खान : पाणी पूरवठयावर होणारा खर्च याकडे लक्ष देणे आहे तसेच नागरीकांना पाणी कसे मिळेल याचकडे पहाणे गरजेचे आहे. शहरात मोठमोठे दवाखाने . मोठमोठे घरासमोर उदयान केलेले आहे. मोठमोठया हॉटेल आहेत याचेसाठी देण्यात येणाऱ्या पाणीपट्टीत वाढ करणे योग्य होईल. निवासी वापरासाठी जे अर्धा इंच पाऊन इंची नळ

कनेक्शनसाठी वाढ करू नये. जलना रोडवर एक व्यक्तीने ३ इंची पााईप लाईन घेतलेली आहे. २४ तास पाणी रहाते. गार्डन केले तसेच घरासाठी पाणी वापरले जते.

श्री. नासेर नहदी : पाणीपटठ्टीत वाढ करू नये. जी वसूली होत आहे जे लोक देतात त्याचेकडून वसूल केली जते. मोठमोठे कारखाने. हॉटेल. दवाखाने सोडून इतर लोकांकडूनच वसूली केली जत आहे. या लोकांकडून पाणीपट्टी वसूली करण्याचे आदेशीत करावे. व अनधिकृत जेनळ कनेक्शन आहे ते शोधावे.

श्री. मिलींद दाभाडे : शहरात अनेक ठिकाणी हॉटेल असेल दवाखाना असेल एक इंची कनेक्शन दाखवले जते व तीन इंची नळ कनेक्शन त्यांचेकडे असते. पाण्याची मोठया प्रमाणा चोरी होते ते शोधणे आवशक आहे. असे केल्यास पाणीपट्टीत वाढ करण्याची गरज नाही. हॉटेल मधे कधीही पाणी टंचाई नसते. सर्वसामान्याना पाणी नसते. जे वसूली अधिकारी कर्मचारी आहे त्यांचेकडून हॉटेलची यादी मागवावी जेणे करून कोणत्या भागात किती हॉटेल आहे हे कळेल व त्या प्रमाणे वसूली करता येईल.

मा.सभापती : महानगरपालिकेने सहा वार्ड कार्यालय केलेले आहे. वार्ड अधिकारी आहे त्यांनी किती वसूली केलेली आहे याची माहिती दयावी प्रथमत:वार्ड इजिनिअर अ ने अगोदर खूलासा करावा. कमी वेळात खूलासा करावा.

प्र.वार्ड अभियंता अ : वार्ड अ ची मागिल थकबकी ५.१०कोटी होती. चालू मागणी २.०७ कोटीची आहे.एकूण ७.१७ कोटीची वसूली या अ वार्ड कार्यालयाकडून करायची आहे. त्यापैकी १.४.२००५ पासून आतापर्यत १.७० कोटी वसूल झालेले आहे. ३३% वसूलीचे प्रमाण आहे.

मा.सभापती : वार्ड अ कार्यालयाकडे किती कर्मचारी व त्यांचा वार्षिक पगारावर किती खर्च होतो.जी वसूली झालेली आहे ती समाधानकारक आहे का स्वत:समाधानकारक आहात का व वसूली का होवू शकली नाही याचा खूलासा करावा.श्री. रामटेके नाही त्यानी माझी परवानगी घेतलेली नाही.

प्र.वार्ड अधि. अ : वार्ड अ कार्यालयात तीन ज्यु. इंजिनिअर तसेच चार दुय्यम अवेक्षक आहेत.

मा.सभापती प्रत्येक वार्ड कार्यालयात काम करण्यासाठी सुसूत्रिकरण करणे आवशक आहे. उपआयूक्तापासून ते कार्यकारी अभियता पासून ते वार्ड इर्जिनिअर यांनी जे जबाबदारीने काम करावयास पाहिजे होते ते केलेले दिसून येत नाही. एका अहवालावरून स्पष्ट दिसून येते. जी वाढ सूचविली ती कशाच्या अ धारे सूचविली हे पहाण्याची गरजआहे. जी वसूलीची आकडेवारी आहे ती कमी आहे. अत्यंत निषकाळजीपणे काम केलेले दिसून येते. आता वार्ड ब अधिकारी यानी खूलासा करावा.

मा.आयुक्त : यापूर्वी झोन अधिकारी वसूलीचे काम करीत होत वार्ड इजिनिअर नाही. परंतू जेंव्हा माहिती आली की ५० कोटीची थकबाकी आहे. त्यापैकी ३० कोटी तरी वसूली करू असे गृहीत धरले होते. आजपर्यत जेरेकॉर्ड होते ते बरोबर ठेवले जत नव्हते. असे माझे मत आहे. जेंव्हा रेकॉर्ड हाती आले तेंव्हा असे दिसूने आले की ३० ते ३२ कोटीच थकबाकी आहे. मागिल वर्षी आठ मोटी वसूल केले होते या वर्षी ११ ते १२ कोटी वसूल केले आहे. पाणीपट्टीमधे ४० ते ५० टक्केची वाढ असून मालमत्ता करामधे ५० ते ६० टक्केची वाढ आहे.

श्री.साहेबराव कावडे : प्रशासन सूधारणा का करीत नाही. क्लिअर काम कूठेही दिसून येत नाही.

मा. आयुक्त : १० ते १२ वर्षाचा इतिहास आहे. वसूली होत नव्हती या वर्षी ५० ते ६० टक्के वसूली केलेली आहे. अनधिकृत नळ कनेक्शन शोधून अभय योजने द्वारे रेग्यूलर करण्यासाठी सूरू केले आहे.

मा.सभापती :पाण्याचें ऑडीट करावे म्हणून अनेक वेळा सूचना केल्या होत्या आतापर्यत रिपोर्ट आलेला नाही. नागरीकांना पाणी भरपूर दिले जत नाही. पाण्याचे ऑडीट होणे गरजेचे

आहे. पाणी पूरवठा योजनेत सूधारणा करण्याची गरजआहे. काही बाबतीत रेकॉर्ड मिळत नाही. ही महापालिकेची जबाबदारी आहे. काम चांगल्या पध्दतीने करण्याची गरज आहे.सिडकोसाठी किती एमएलडी पाणी दिले जते.

कार्य. अभियंता.(पापू) : सिडको भागात ३० एमएलडी पाणी पूरवठा केला जतो.मरीमाता सोडून व टँकर धरून इतके पाणी दिले जते.टँकरला साधारणपणे एक एमएलडी पाणी जते.

मा.सभापती :रजिष्टर रेकॉर्डवरून सिडको भागात गेल्या महिन्यात २२ ते २६ एमएलडीच पाणी दिलेले आहे. यापेक्षा जस्त नाही.. यासाठी माहिती पाहिजे की जे लोक कर भरतात त्याचेवर अन्याय होता कामा नये.

उपअभियंता (पापू) : सिडको हडको भागात २८ ते २९ एमएलडी पाणी दिल्या जते.

मा.सभापती : इतिवृत्तात याची नोंद करून घ्यावी व जे लॉकबूक आहे ते स्थायी समितीच्या उदयाच्या बैठकीत संबधीत अधिकारी यांनी घेवून यावे.आता वार्ड क चे अधिकारी यांनी वसूलीच्या संदर्भात खूलासा करावा.

वार्ड अभियंता क : सन २००५-२००६ साठी ३.२२ कोटीची डिमांड आहे २.३५ कोटी थकबाकी तसेच ८७ लक्ष चालू मागणी आहे. वसूली ही १.१६ कोटी झालेली आहे. ३६टक्के वसूली चे प्रमाण येते उर्वरीत १२ ते १३ दिवसात ५१टक्के पर्यत वसूलीचे प्रमाण येईल.

श्री.मुजेब खान : जी वसूली केली ती कोणकोणत्या भागातून वसूल केलेली आहे. कोणत्या भागातून जस्त व कोणत्या भागातून कमी वसूली झालेली आहे याचा खूलासा करावा.मोठमोठया नागरीकाकडून वसूली केलेली नाही गरीबाकडून जस्त वसूल केलेले आहे.

वार्ड अभियंता क : जे मोठे खातेदार आहे त्यात विभागीय आयूक्त कार्यालय येते. त्या कार्यालयाकडे १.७३ लक्ष थकबाकी आहे येत्या २३ तारखेला ती रक्कम मिळणार आहे. सर्वात जस्त रोषणगेट भागातून वसूली केलेली आहे.

श्री.मुजेब खान : जी वसूली केली ती जनतेवर दबाव टाकून वसूली केलेली आहे. हे बरोबर नाही मी स्वत:बघितले. मोठमोठया हॉटेल व दवाखाने आहेत त्याचेकडून अशाच पध्दतीने वसूली केलेली आहे काय ?

वार्ड अभियंता क : वसूली संदर्भात सर्वांना सक्ती करण्यात आली होती. स. सदस्य श्री.मुजेब खान यांचे भागातील एकच खातेदार जेकी छोटूभाई पोपटभाई यांचेकडे जस्त थकबाकी आहे.

मा. सभापती : वार्ड कार्यालय क मधे नळ कनेक्शन किती आहे.कोणत्या टाकीवरून पाणी दिले जते व किती एमएलडी पाणी दिले जते.

श्री.मुजेब खान : रविंद्रनगर पासून ते पोलीस कॉलनी पर्यत अंदाजे किती नळ कनेक्शन अनधिकृत आहे.

वार्ड अभियंता क : ४७२२ नळ कनेक्शन आहे. त्यापैकी ६३ नळ कनेक्शन हे कमर्शियल आहे. या ठिकाणी शहागंज येथील टाकी तसेच मरीमाता टाकीवरून पूरवठा होतो. पाणीपूरवठा किती होतो या बध्दल मला माहिती देता येणार नाही. सुमारे २२०० अनधिकृत नळ जेडणी असण्याची शक्यता आहे.

श्री.मुजेब खान : जे अनधिकृत २२०० नळ कनेक्शन एकाच रस्त्याला आहेत. असे शहरात किती असतील. या पाण्यासाठी महापालिकेने खर्च करायचा व त्याचा बोज इतर नागरीकांवर पाणीपट्टी वाढवून टाकायचा हे बरोबर नाही. अनधिकृत नळ शोधणे प्रशासनाचे काम आहे. या संबधी कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.मोठमोठया लोकाकडे एक इंची नळ कनेक्शन मोठया पाईप वरून आहे ते काढून गल्ल्यामधे जी पाईप लाईन टाकलेली आहे त्यास कनेक्शन जेडण्यात यावे. टाकीमधे पाणी वर जत नाही मी नेहमी सभागृहात हा प्रश्न मांडलेला आहे याची दखल घेण्यात यावी.

श्री. कवरसिंग बैनाडे : अनधिकृत नळ कनेक्शन संदर्भात काय कार्यवाही करणार आहे तसेच सिडको भागात २४२७५ नळ कनेक्शन आहे. अनधिकृत एकही दिसणार नाही. सिडको भागातील ४.७८ कोटीचे उद्‌दीष्ट होते त्यापैकी ४ कोटी वसूल केले. उर्वरीत वसूली ही ज्या सिडको भागात स्किम आहे त्याचेकडील बाकी असेल. सिडकोत कौलारू घराची स्किम आहे. चार घरे मिळून एक नळकनेक्शन होते . त्याचेकडे असेलेले रक्कम माफ केले होते. १००टक्के वसूली सिडको हडको भागातील पाणीपट्टी वसूली झालेली आहे. वसुलीसाठी सर्व अधिकाऱ्यांना आम्ही मदत करतो. आणि पाणी एक दिवसा आड देवून ४० मिनिटे कधी तर ३० मिनिटे पाणी मिळते शहरात १ तास पाणी दिले जते. काही भागात ५० लक्षच वसूली होवून सूध्दा त्यांना दररोज पाणी दिले जते. याचा अर्थ काय प्रशासनाने याकडे गार्भीर्याने लक्ष दयावे.नसता आम्ही सिडकोचे लोकाबरोबर मोर्चा काढून वसूलीसाठी मदत करणार नाही.

मा.सभापती : सिडको हडको भागात जे काही एक दिवसाआड पाणी दिले जते त्यात सूधारणा करण्याची आवशकता आहे. एक दिवसा आड कधी दोन दिवसा आड पाणी दिले जते. याभागातील वसूली चा विचार करता या भागात दररोज पाणी देण्याची व्यवस्था प्रशासनाने करावी. वार्ड ड च्या संदर्भात माहिती द्यावी.

वार्ड अभियंता, ड : मागिल थकबाकी ४.६० व चालू मागणी १.९८ कोटी असे एकूण मागणी ६.५७ कोटीची आहे. टारगेट ४.६० कोटी वसूली २.१७ वसूलीचे प्रमाणे ४८ टक्के आहे.एकूण नळ संखया १०७८३ त्यात कमर्शियल १२० आहे. अनधिकृत नळ कनेक्शन हे सर्वे केल्यानंतरच सांगता येईल.

मा.सभापती : वार्ड अभियंता ई यांनी खूलासा करावा की वसूली किती झालेली आहे.

वार्ड अभियंता इ : ११४१५ नळ कनेक्शन असून एकूण डिमांड ६.१५ कोटी चालू डिमांड २.०५ कोटी आहे. १.५१ कोटी आजपर्यत्ची वसूली झालेली आहे. वसूलीचे प्रमाण २६ टक्के येते.

मा.सभापती : या भागात कोणत्या टाकीवरून पाणी दिले जते व किती एमएलडी पाणी दिले जते.

वार्ड अभियंता : एन -५ तसेच क्रांतिचौक येथून पाणीपूरवठा या भागात होतो. किती एमएलडी होते या संदर्भात निश्चित माहिती माझ्याकडे नाही.नळाची संख्या लक्षात घेता ११ एमएलडी पाणी घेतले जत असावे.

उपअभियंता(पाणपुण) : ३५ हजर नळ कनेक्शनसाठी एन-५ येथून पाणी दिले जते. डिटेल माहिती माझ्याकडे नाही. सिडको साठी २८ ते ३० एमएलडी पाणी येते यातून ई वार्ड कार्यालय अंतर्गत काही भाग जे गारखेडा वगळता पाणी पूरवठा एन-५ येथील टाकीतून दिला जतो.

मा.सभापती : वार्ड ई कार्यालय अंतर्गत येणाऱ्या भागातील जवळपास १० हजर नळ कनेक्शनला एन -५ येथील टाकीतून तसेच इतर सिडको तील २४ हजर नळ कनेक्शन असे एकूण ३४ हजर नळ कनेक्शनला पाणी दिले जते. संबधीत अधिकारी हे जेव्हा स्थायी समितीच्या बैठकीत येतात तेंव्हा संपूर्ण माहिती बरोबर आणणे आवशक आहे. या संपूर्ण चर्चेची प्रशासनाने दखल घ्यावी व सिडको हडको भागात पाणी पूरवठा कमी पडणार नाही याची दखल घ्यावी. असे आदेशीत करण्यात येते. आता वार्ड फ च्या संदर्भात माहिती देण्यात यावी.

वार्ड अधिकारी फ : नळ कनेक्शन संख्या ११४५२ असून एकूण डिमांड ५.१६ कोटी चालू डिमांड २.०८ अशी एकूण ७.१७ कोटीची थकबाकी आहे. १५ मार्च पर्यत २.०८ कोटी इतकी वसूली झालेली आहे. वसूलीचे प्रमाणे ३३ टक्के.आहे.

श्री.मुजेब खान : जकात पावती बूक संदर्भात मी वारंवार सभागृहात प्रशन उपस्थित केला चौकशी करण्याचे आदेशीत केलेले होते वांरवार मागणी करून ही कार्यवाही होत नसेल तर मी

आपल्याकडे उपोषणास बसण्या संदर्भात निवेदन देत आहे, मा. आयुक्त तसेच मा. महापौर यांचेकडे निवेदनाची प्रत दिली जईल. (या संदर्भात निवेदन मा. सभापती यांचे कडे सादर करतात.)

मा.सभापती : स. सदस्य श्री. मुजेब खान यांनी जकात विभागातील भ्रष्टाचाराबाबत कार्यवाही करण्या संदर्भात निवेदन दिले होते परंतू त्यांना योग्य असा खूलासा मिळालेला नाही म्हणून त्यांनी आजउपोषणास बसण्या बाबत निवेदन दिलेले आहे. त्यांना मी विनंती करतो की २४ तासाची मूदत अत्यंत कमी असून उदयाही अर्थसंकल्पावर चर्चा होणार आहे. या संदर्भात सर्व सदस्य माझ्यासह आपल्या पाठीशी आहोत. प्रशासनाने न्याय दिला नाही तर योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार सभागृहाला आहे त्या प्रमाणे कार्यवाही होईल.

श्री. मुजेब खान : आपल्या विनंती मी मान देवू शकतो परंतू गेल्या सहा महिण्यापासून मी या संदर्भात बोलत आहे, कार्यवाही होत नाही. ज्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत चौकशी करायची होती ते अधिकारी त्याच विभागात काम करीत आहेत त्यांना तेथेच ठेवणे जरूरी होते का? चौकशी अधिकारी यांची नेमणूक केली त्याचेकडे कागदपत्र दिले जत नाही. २४ तासाच्या आत न्याय मिळाला नाही तर मी उपोषणास बसणार आहे याची नोंद घ्यावी.

कर निर्धा. व संकलक : ३५ कोटीचे उद्‌दिष्ट होते. १३ मार्च पर्यत १२.१८ कोटी वसूली झालेली आहे. वसूलीचे प्रमाण हे ३५ टक्के येते. वसूलीचे जबाबदारी ही ही वार्ड अभियंता यांचेकडे दिलेली होती इतर ही कामे दिलेली आहे. अजूनही कार्यक्षमता वाढविण्यास वाव आहे.

मा.सभापती : केलेला खूलासा समाधान कारक नाही. २० किंवा ३५ टक्के वसूली होत असेल तर योग्य नाही. मालमत्ता व पाणीपट्‌टीची वसूली झाली नाही म्हणून ५० कोटीची कामे या शहरात झालेली नाही. वसूलीचे प्रमाण अत्यंत कमी असल्या कारणाने विकासाच्या कामे संपूर्ण थांबलेली आहे. उदयाच्या बैठकीला जेसंबधीत अधिकारी असतिल त्यांनी अभ्यास करून यावे उदया ११ वाजता याच सभागृहात सभाग होईल. वार्ड अधिकारी यांनी मागणी रजिष्टर घेवून उद्या सभेला यावे. उपआयुक्त महसूल व प्रशासन यांचेकडे जी जी कामे दिली होती त्या कामाची जबाबदारी टाळता येणार नाही. त्या जबाबदारीच्या संदर्भात संपूर्ण अहवाल देण्यात यावा. पाण्याच्या ऑडीटच्या संदर्भात आजपर्यत काय काम केले आहे. ऑडीटची कार्यवाही कूठपर्यत आलेली आहे. कोणत्या बाबीचा समावेश केलेला आहे. यासह संपूर्ण माहिती सभागृहात आणावी. उद्या सकाळी ११ वाजता सभा सुरू होईल, त्यात सन २००६-२००७ च्या मूळ अर्थसंकल्पावर चर्चा करण्यात येईल.

या बरोबरच आजची सभा तहकूब करण्यात येते, असे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद